**महाराष्ट्र शासन**

**सार्वजनिक आरोग्य विभाग**

(शासन निर्णय क्रमांक - आरईएस१०.१००१/प्र.क्र.१ १२२/सेवा१दिनांक -११/१२/२००१ )

# बहुउद्देशिय आरोग्य कर्मचारी (महिला) या पदाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या

बहुविध आरोग्य सेवा योजना अंतर्गत आरोग्य सेवेतील अमुलाग्र बदल लक्षात घेता बहुउद्देशिय आरोग्य कर्मचारी (स्त्री) या पदाची कर्तव्ये व जबाबदा-या या शासन निर्णयाद्वारे निश्चित करण्यात आल्या आहेत.

**आरोग्य सेविकेच्या जबाबदा-या-**

**अ) प्रजनन व बालआरोग्य कार्यक्रम-**

१)समाजाच्या गरजांवर आधारित उपकेंद्र कृती आराखडा तयार करणे.

२)गरोदर मातांची नोंदणी करणे व त्यांना प्रसुतीपूर्व दरम्यान व प्रसूतीपश्चात सेवा देणे.

३)रक्तक्षयाकरिता शारिरीक तपासणी,लघवीतील साखर व प्रथिनांची तपासणी,रक्तातील लोहाचे प्रमाण,रक्तदाब घेण,वजन घेणे आणि पोषण व विश्रांतीबाबत सल्ला देणे.

४)सर्व गरोदर स्त्रीयांची लैंगिक आजारांची तपासणी होईल याची खात्री करणे.

५)जोखमीच्या,गुंतागुंत असलेल्या गरोदर मातांना वैद्यकिय उपचाराची आवश्यकता असलेल्या आणि प्रजननविषयक समस्या असलेल्या स्त्रीयांना संदर्भसेवेकरिता पाठविणे.

६)कार्यक्षेत्रात होणा-या एकूण प्रसूतीपैकि ५० टक्के प्रसूती स्वतः करणे.

७) कार्यक्षेत्रातील सर्व प्रसूती केवळ प्रशिक्षीत व्यक्तिंकडून होतील याची खात्री करणे.व प्रशिक्षीत दाईकडून होणा-या बाळंतपणावर देखरेख करणे व त्यांना मदत करणे.

८)अडचणीचे बाळंतपण व जोखमीचे नवजात अर्भकांना प्राथमिक आरोग्य केंद्रात/प्रथमस्तर संदर्भसेवा केंद्रात ताबडतोब पाठविण्यासाठी मदत व पाठपूरावा करणे.

९) कार्यक्षेत्रात बाळंत झालेल्या प्रत्येक स्त्रीस कमीत कमी तीनदा भेटी देणे.आवश्यक त्या सेवा व सल्ला देणे.उदा. स्तनपान, अर्भकांची काळजी आणि मातेची काळजी.

१०)बालकांची वाढ व विकासाकडे लक्ष देणे.आणि आवश्यकता असल्यास संदर्भसेवा उपलब्ध करुन देणे.

११)मातांना व वयात येणाऱ्या मुलींना व्यक्तिगत किंवा एकत्रितपणे खालील बाबींवर आरोग्य शिक्षण देणे. कौटुंबिक आरोग्य,माता आणि मुलांचे आरोग्य,कुटुंब नियोजन, आहार,सांसर्गिक आजारावर नियंत्रण, लसीकरण,वैयक्तिक व परीसर स्वच्छता ईत्यादी जेणेकरुन रोगापासून बचाव करण्यासाठी आणि चांगले आरोग्य राखण्यासाठी लोक स्वतः पुढे येतील.

१२)लैंगिक आजार व प्रजनन मार्गाचा जंतुसंसर्ग झालेल्या रुग्णांचा शोध घेणे व त्यांना आवश्यक त्या सेवा देणे.

१३)उपकेंद्र स्तरावर आरोग्य सेवा सत्रात आरोग्य सहाय्यिका व वैद्यकिय अधिकारी यांना मदत करणे.

१४)प्रत्येक गांवांत आरोग्य सेवा सत्राचे आयोजन करुन लाभार्थ्याला आवश्यक सर्व आरोग्य सेवा पुरविणे.

१५)सर्व गरोदर स्त्रियांना धनुर्वात प्रतिबंधक लसीच्या आवश्यक मात्रा देणे.

१६)कार्यक्षेत्रातील सर्व अर्भके व मुलांचे लसीकरण वेळापत्रकाप्रमाणे योग्य वयात करणे.

१७)लसीकरणासाठी आवश्यक असलेल्या सुया व सिरींजेस आणि इतर साहित्याचे व्यवस्थित पणे निर्जंतुकिकरण झाले किंवा नाहि याची खात्री करणे. व प्रत्येक लाभार्थीला वेगळी सिरींज व सुई वापरणे.

१८) लसीची तपासणी करणे.व दिलेलया सूचनांचे पालन करणे. लसीचे वेळापत्रक,महत्वाबाबत स्त्रियांना आरोग्य शिक्षण देणे.

१९) शालेयपूर्व बालके,गरोदर माता,स्तनदा माता आणि अर्भकांमध्ये कुपोषणाचे रुग्ण शोधून काढून अशा मुलांना आवश्यक तो उपचार देणे. आणि नजीकच्या अंगणवाडी/बालवाडी केंद्रात पुरक आहार घेण्याबाबत किंवा आवश्यकता असल्यास वैद्यकिय अधिकारी प्रा.आ.केंद्र यांचेकडे संदर्भसेवेसाठी रवानगी करणे.

२०) शालेयपूर्व बालके,गरोदर माता,स्तनदा माता आणि कुटुंब नियोजनाची पध्दत स्विकारणाऱ्याना आरोग्य सेविकांशी समन्वय साधून लोहयुक्त गोळयांचे वाटप करणे.

२१) तीन वर्षाखालील बालकांना जीवनसत्व अ च्या मात्रा पाजणे.

२२) स्थनिक पातळीवर उपलब्ध असणाऱ्या अन्नपदार्थापासून समतोल आहार तयार करण्याबाबत लोकांना माहिती व आरोग्य शिक्षण देणे.

२३) योग्य जोडपी आणि लहान मुलांच्या नोंदवहयांच्या आधारे कुटुंब नियोजन स्विकार करण्याकरीता जोडव्यांना व्यक्तिगत किंवा एकत्रितपणे प्रवृत्त करणे, कुटुंब कल्याण संबंधित सर्व नोंदवहया अद्यावत ठेवणे.योग्य जोडप्यांना कुटुंब नियोजनाचा संदेश देणे.आणि कुटुंब नियोजनासाठी प्रवृत्त करणे.

२४) पात्र जोडप्यांना पाळणा लांबवण्यासाठी साधने पुरवणे.

२५) कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया करुन घेण्यासाठी आणि तांबी बसवून घेण्यासाठी आलेल्या लाभार्थीना सुविधा पुरवणे व मदत करणे.

२६) कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया करुन घेतलेल्या लाभार्थींचा पाठपुरावा करणे.आणि त्यांच्या समस्या सोडविणे.

२७) समाधानी स्त्री लाभर्थी,स्थानिक नेते,आरोग्य मार्गदर्शक,शिक्षक,स्वयंसेवक,आणि इतरांशी चांगले स्नेहसंबंध प्रस्थापित करुन कुटुंब कल्याण कार्यक्रमाला चालना देण्याबाबत प्रवृत्त करणे

२८) निरोध व तोंडाने घ्यावयाच्या गर्भनिरोधक गोळयांच्या वाटपासाठी डेपोहोल्डर्सची निवड करणे.त्यांना प्रशिक्षण देण्यासाठी आरोग्य सहाय्यिकेला मदत करणे.आणि डेपोहोल्डर्सना वरील साधनांचा नियमित पुरवठा करणे.

२९) महिला मंडळाच्या सभेत सहभागी होवून जमलेल्या समुदायाला कुटुंब कल्याण,मुलांचे आरोग्य इ.बाबत माहिती व आरोग्य शिक्षण देणे.

३०) लैंगिक समानतेबाबत समाजाला प्रवृत्त करणे व प्रजनन व बाल आरोग्य कार्यक्रमांत पुरुषांचा सहभाग साधण्याबाबत प्रवृत्त करणे.

३१) वैद्यकिय गर्भपात करुन घेणऱ्या स्त्रियांना जवळच्या सरकारमान्य केंद्रात पाठवण्यासाठी मदत करणे व आरोग्य सहाय्यिकेला कळवणे.

३२) वैद्यकिय गर्भपात करुन घेण्यासाठी उपलब्ध असलेल्या सुविधांची माहिती स्त्रियांना करुन देणे आणि त्याबाबत आरोग्य शिक्षण व संदर्भसेवा पुरविणे.

३३) असुरक्षित गर्भपात केल्यामुळे होणाया गंभीर परिणामांबाबत लोकांना आरोग्य शिक्षण देणे.त्यांना असुरक्षित आणि बेकायदेशिर गर्भपात करुन घेण्यांपासून परावृत्त करणे.

**ब) दाई प्रशिक्षण**

१) कार्यक्षेत्रातील सर्व दाईंची यादी तयार करुन त्यांना कुटुंब कल्याण व सुरक्षित प्रसुतीबाबत मार्गदर्शन करणे.
२) दाई प्रशिक्षणांत आरोग्य सहाय्यिकेला मदत करणे.

**क) साथरोग नियंत्रण [**

१) गृहभेटी दरम्यांन साथीच्या आजारांचे रुग्ण शोधून काढणे. उदा.अतिसार,हगवण,पूरळ असलेले तापाचे रुग्ण,मेंदूदाह,धनुर्वात,काविळ,घटसर्प,पोलिओ इ. आणि अचानक साथीचे आजाराची अपेक्षेपेक्षा जास्त रुग्ण आढळल्यास आरोग्य सहाय्यक व वैद्यकिय अधिकारी यांना तातडीने कळविणे.
२) अतिसाराच्या सर्व रुग्णांस क्षारसंजीवनीचे द्रावण वयोगटानुसार देणे.
३) संशयित मोतिबिंदू आणि अंधत्वाच्या सर्व रुग्णांच्या नोंदी घेवून त्यांना पुढील उपचारासाठी पाठवणे.
४) गृहभेटीच्या वेळी आढळून आलेलया तापाच्या रुग्णंचा रक्त नमुना घेवून त्यांना गृहितोपचार देणे.आणि पुढील कार्यवाही करण्यांस आरोग्य सेवकाला कळवणे.
५) गृहभेटीच्या वेळी कातडीवर चट्टा आढळलयास किंवा कातडीच्या रंगामध्ये बदल व त्या ठिकाणी संवेदना नसलेले रुग्ण शोधणे व ते आरोग्य सहाय्यकाला कळवणे.
६) क्षयरोग्यांची आणि कुष्ठरोग्यांची यादी करण्यांस आरोग्य सेवकाला मदत करणे. वरील रुग्ण नियमित औषधोपचार घेतात काय यावर लक्ष ठेवणे. अनियमित व अर्धवट उपचार घेतलेल्या रुग्णांना नियमित व सेपूर्ण औष्धउपचारासाठी प्रवृत्त करणे. आणि आरोग्य सहाय्यक यांच्या निदर्शनास आणणे.

**ड) जीवनविषयक आकडेवारीची नोंद .**

१) कार्यक्षेत्रात होण्याऱ्या जन्ममृत्युंची नोंद करणे. व तसा अहवाल आरोग्य सहाय्यक यांना कळविणे.
२) कार्यक्षेत्रात होणाऱ्या रुग्णांची नोंद करणे आणि कायदयानुसार कमी वय असणाऱ्या मुलामुलींचे लग्न ठरल्यांस किंवा झाल्यांस आरोग्य सहाय्यक(पु)यांच्या निदर्शनांस आणणे.
३) जन्म आणि मृत्युची नोंद वेळीच करण्याचे महत्व लोकांना सांगणे.

ई) प्रथमोपचार व किरकोळ आजारांवर उपचार [

१) प्रथमोपचाराचे साहित्य,क्षारसंजिवनी पाकिटे व किरकोळ आजारावरील औषधे योग्य त्या व्यक्तिंना/रुग्णांना उपलब्ध करुन देणे.
२) गंभीर आजार व गुंतागुंत झालेल्या,किरकोळ व साध्या आजारांच्या रुग्णांना वैद्यकिय अधिकारी प्रा.आ.केंद्र किंवा जवळच्या दवाखान्यांत पाठवणे.
३) आरोग्य मार्गदर्शकाने पाठविलेल्या रुग्णांवर उपचार करणे व आवश्यक वाटल्यांस रुग्ण पुढील उपचारासाठी पाठवणे.

**फ) संघकार्य..**

१) प्राथमिक आरोग्य केंद्रात होणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या प्रत्येक सभेत हजर राहाणे व सहभागी होणे.
२) आपल्या कार्याचे आरोग्य सेविकेची आणि इतर आरोग्य कर्मचाऱ्यांशी समन्वय साधणे.
३) प्रत्येक आठवडयाला एकदा तरी आरोग्य सहाय्यक (स्त्री) यांना भेट देणे. आणि त्यांचा सल्ला व मार्गदर्शन आवश्याकतेप्रमाणे घेणे.
४) कार्यक्षेत्रांत घेण्यांत येणाऱ्या विविध शिबीरात आणि मोहिमेंत सहभागी होणे.

५) स्थानिक स्वयंसेवी संस्था शोधून त्यांना समाजाचे आरोग्य चांगले राखण्यांस प्रवृत्त करणे.

**म) अहवाल व नोंदी ठेवणे.**

**१**) सहा आठवडयानंतरच्या सर्व गरोदर माता,१२ महिने वयोगटांतील सर्व बालके,शालेयपूर्व बालके आणि १५ ते ४५ वयोगटांतील सर्व स्त्रियांची नोंद करणे.व नोंदवही तयार करणे.

२) प्रसुतिपूर्व,प्रसुतिसंबंधित आणि मुलांना देण्यांत यंणाऱ्या सेवांचे अहवाल तयार करणे.

३) योग्य जोडप्यांची यादी आणि लहान मुलांची यादी तयार करणे व अद्यावत ठेवण्यासाठी आरोग्य सेवकाला मदत करणे.

४) कुटुंब कल्याण साहित्य वाटप,तांबी बसवलेल्या स्त्रिया, कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया करुन घेणाऱ्या लाभार्थ्यांची यादी ठेवणे.

५) उपकेंद्र स्तरावर आरोग्य सेवा सत्रात वाटप केलेल्या स्त्रियांची नोंद ठेवणे.

६) आलेले साहित्य,व वाटप केलेले साहित्याची नोंद ठेवणे.

७) मासिक प्रगती अहवाल तयार करुन तो वेळीच आरोग्य सहाय्यिकेकडे पाठवणे.

**ह) इतर**

१) अंगणवाडीला भेट देवून कुपोषित मुलांची यादी करुन मातेला आहाराबाबत आरोग्य शिक्षण देणे.

२) शालेय आरोग्य तपासणीत वैद्यकिय अधिकारी व आरोग्य सहाय्यक यांना मदत करणे.
नवीन कुष्ठरोगी शोध मोहिमेत सहभाग घेणे.